# सामान्य प्रशासन विभाग

## माहिती

| | |
|---|---|
| **विभागाचे नाव** | सामान्य प्रशासन विभाग |
| **खाते प्रमुखाचे पदनाम** | सहाय्यक प्रशासन अधिकारी |
| **विभागाचा दुरध्वनी क्रमांक** | 02521-220036 |
| **विभागाचा ईमेल** | bdotalasari@gmail.com |

पदोन्नती –
पंचायत समितीकडे कार्यरत असणाऱ्या कनिष्ठ कर्मचाऱ्यांना शासनाच्या तरतूदींनुसार वरिष्ठ पदावर पदोन्नतीसाठी पात्र कर्मचार्याची माहिती जिल्हा परिषद कडे सादर करणे
नियतकालीक बदल्या -
तालुका अंतर्गत शासनाच्या सूचनांप्रमाणे नियतकालिक बदल्या वर्षयातुन एकदाच माहे मे मध्ये केल्या जातात बदलीपात्र कर्मचाऱ्यांना ५% विनंती व ५% प्रशासकीय अशा एकूण १०% बदल्या करता येतात. त्यानुसार सेवाजेष्ठता यादी प्रमाणे बदल्यांचे कामकाज पहाणे व इतर विभागांना बदल्याबाबत मार्गदर्शन करणे.

**नोंदणी शाखा-**
तालुका स्तरावरील सर्व टपाल या शाखेकडे नोंदवून संबंधित विभागाकडे कार्यवाही साठी पाठविण्यात येते .

**सभांचे कामकाज**

पंचायत समिती मासिक सर्वसाधारण सभा -

पंचायत समिती तलासरी मासिक सर्वसाधारण सभा दर एक महिन्यातून एकदा घेण्याची तरतूद आहे सभेचे अध्यक्ष माननीय सभापती पंचायत समिती तलासरी यांचेकडे असते. या सभेत जिल्हा परिषदेमार्फत व पंचायत समिती मार्फत राबविणेत असलेल्या विविध योजना व विकास कामे, प्रलंबित प्रकरणे इत्यादींचा आढावा घेऊन मार्गदर्शन केले जाते. सामान्य प्रशासन विभागाच्या नियोजन संकलनामार्फत या सभेचे आयोजन करण्यात येते.

माहितीचा अधिकार कायदा २००५ अंमलबजावणी -

माहितीचा अधिकार कायदा २००५ अंमलबजावणी करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागात सहाय्यक प्रशासन अधिकारी हा शासकीय माहिती अधिकारी म्हणून कामकाज पाहतात व अपिलीय अधिकारी म्हणून गट विकास अधिकारी हे कामकाज पाहतात .